# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे - ३७

## शालेय प्रसार परीक्षा विभाग

## आंतरशालेय लोकमान्य टिळक वक्तृत्व स्पर्धा

**माध्यम : मराठी/ संस्कृत/ हिंदी/ इंग्रजी**

जा.क्र./शाप्रप/वक्तृत्व स्पर्धा/२३/ दि. १ जून २०२३

प्रति,

मा. मुख्याध्यापक

सस्नेह नमस्कार

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे आपणांस शुभेच्छा!

आपणास सूचित करण्यात येते की, दरवर्षीप्रमाणे विद्यापीठाच्या शालेय प्रसार परीक्षा विभाग व लोकमान्य टिळक पुण्यतिथी मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने यावर्षीही मराठी/ इंग्रजी/ हिंदी/ संस्कृत माध्यमातून वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करीत आहोत. या स्पर्धा रविवार दि. ०२ जुलै २०२३ रोजी घेण्यात येणार आहेत. या स्पर्धेमध्ये आपल्या शाळेच्या सहभागाची अपेक्षा करीत आहोत. आपल्या सहभागामुळे ही स्पर्धा यशस्वी होण्यास मदत होईल. (**स्पर्धा ही केवळ पुणे जिल्हामध्ये होईल याची नोंद घ्यावी.**)

स्पर्धेचे वेळापत्रक व विषय पुढीलप्रमाणे -

## लोकमान्य टिळक वक्तृत्व स्पर्धा विषय

| गट क्र. | इयत्ता | विषय (मराठी / इंग्रजी) | वेळ |
|---|---|---|---|
| १. | इ. ५ वी ६ वी | १. लोकमान्य टिळकांचे गुणविशेष<br>1. Characteristics/Attributes of Lokmanya Tilak<br>२. लोकमान्य टिळकांच्या आठवणी<br>2. Memories of Lokmanya Tilak | २ मि. |
| २. | इ. ७ वी ८ वी | १. लोकमान्य टिळक राष्ट्रीयत्त्वाचे द्रष्टे<br>1. Lokmanya Tilak a visionary of Nationalism<br>२. लोकमान्य - बाळ गंगाधर टिळक<br>2. Lokmanya – Bal Gangadhar Tilak | ३ मि. |
| ३. | इ. ९ वी १० वी | १. लोकमान्यांचे शिक्षणप्रेमी विचार<br>1. Lokmanya Tilak’s thoughts on Education<br>२. लोकमान्य टिळक - लोकशाहीचे आद्यप्रणेता<br>2. Lokmanya Tilak a Precuresor/Father of Democracy | ४ मि. |
| ४. | शिक्षकांसाठी | १. संशोधक टिळक<br>1. Lokmanya Tilak as Researcher<br>२. गीतारहस्य व लोकमान्य टिळकांचे विचार -<br>2. Gitarahasya and Lokmanya Tilak’s thoughts | ५ मि. |

| गट क्र. | इयत्ता | विषय (संस्कृत / हिंदी) | वेळ |
|---|---|---|---|
| १. | इ. ५ वी ते ७ वी | १. लोकमान्य तिलक जी के गुण<br>१. लोकमान्यतिलकमहोदयानां गुणविशेषाः \|<br>२. लोकमान्य तिलक जी के संस्मरण<br>२. लोकमान्यतिलकमहोदयानां स्मृतयः \| | २ मि. |
| २. | इ. ८ वी ते १०वी | १. तिलक जी के शिक्षाप्रेमी विचार<br>१. लोकमान्यानाम अध्ययनप्रेरकः \|<br>२. लोकमान्य तिलक जी – लोकतंत्र के अग्रदूत<br>२. लोकमान्यतिलकमहोदयानां – लोकतंत्रस्य आद्यः प्रणेता \| | ४ मि. |

## सर्व माध्यमाच्या स्पर्धेसाठी सूचना

- स्पर्धा दिनांक व वेळ : रविवार दि. २ जुलै २०२३ रोजी स. ९.१५ पासून, दु. १ ते १.३० मधली सुट्टी
- स्पर्धेचे ठिकाण : टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, ७ वा मजला, जयंतराव संकूल इमारत (सभागृह) मुकुंदनगर, गुलटेकटी, पुणे – ३७
- पारितोषिक वितरण वेळ व ठिकाण : ४ जुलै २०२३ रोजी स. ८.३० वाजता.÷महात्मा फुले मंडई, पुणे – ३०

## स्पर्धेसाठी नियम व विषय

- प्रत्येक माध्यमाच्या गटासाठी ४ विद्यार्थ्यांची नावे कळवावीत.
- सर्व पालकांना/स्पर्धकांना/शिक्षकांना स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमावेळेस स्पर्धेबाबत आवश्यक त्या महत्त्वाच्या सूचना देण्यात येतील.
- **सर्व स्पर्धकांना स्पर्धेचे प्रवेश पत्र (लॉट क्र.) स्पर्धेच्या दिवशी स. ९ ते ९.३० या वेळेत देण्यात येतील.** त्यावेळेस प्रत्येक स्पर्धकांस खाऊचे पाकीट दिले जाईल.
- सर्व स्पर्धकांनी वेळेपूर्वी १५ मिनिटे सभागृहात उपस्थित रहावे. विद्यार्थी स्पर्धकांसोबत प्रशालेने आपले एक अध्यापक पाठवावेत.
- **मराठी व इंग्रजी माध्यमाच्या** प्रत्येक गटातील पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांस तसेच शिक्षक स्पर्धकास **प्रथम क्रमांक रू. १०००/–, द्वितीय क्रमांक रू. ७००/–, तृतीय क्रमांक रू. ५००/–** रोख पारितोषिक तसेच पुस्तके व प्रशस्तिपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येईल. परीक्षक समितीची निर्णय अंतिम असेल.
- प्रशालेतील विद्यार्थी स्पर्धकांच्या पूर्ण नावासह आपल्या प्रवेशपत्रिका दि २८ जून २०२३ पर्यंत पुढील पत्यावर पाठवाव्यात. शालेय प्रसार पारीक्षा विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, मुकुंदनगर, गुलटेकडी, पुणे – ४११ ०३७. दूरध्वनी : ०२०–२४४०३०४३/९०
  स्पर्धक विद्यार्थ्यांची नावे लवकरात लवकर कळवावी ही विनंती. आपली नोंदणी tmvshaleyaprasar@gmail.com या मेल आयडीवर करावी.
- **बँकेचा तपशील – प्रवेश शुल्क रू. ५०/– Google pay** द्वारा **Transfer** करता येतील. पैसे **Transfer** झाल्यानंतर **Screenshot** विद्यार्थ्यांच्या नावासहित मेल करावा.

  **बँक ऑफ महाराष्ट्र A/C No – 20027052461**

  **IFSC Code - MAHB0000320**
- **टीप : सर्व माध्यमात प्रत्येक गटात किमान २५ स्पर्धक असल्यास त्या गटात १,२,३ क्रमांकाची पारितोषिके दिली जातील. अन्यथा केवळ प्रथम क्रमांकाचे पारितोषिक दिले जाईल. या वर्षीपासून प्रत्येक स्पर्धकास रू. ५० प्रवेश शुल्क असून एका शाळेस प्रत्येक माध्यमास प्रत्येक गटासाठी जास्तीत जास्त ४ स्पर्धकांची नोंदणी करता येणार आहे. स्पर्धेत या वर्षीपासून झालेल्या बदलाची सर्वांनी नोंद घ्यावी.**

आपले,

श्रीमती सरिता साठे
अध्यक्ष – विद्या प्रसारक मंडळ
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

श्री. अजित खाडीलकर
कार्यवाह
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ